जिल्हाधिकारी कार्यालय नंदुरबार

(गृह शाखा)

---

क्रमांक/गृह/कक्ष-2/ड-2/कावि-234/2010

नंदुरबार,दिनांक-05/02/2010

**परीपत्रक**

**विषय- शस्त्र परवाना मंजुरी व नुतनीकरणासंदर्भात तपासणी सुचीच्या अनुषंगाने परीपत्रक निर्गमित होणे बाबत**

शस्त्र अधिनियम 1959 व शस्त्र नियम 1962 मधील तरतुदीनुसार जिल्हास्तरावर शस्त्र परवाना मंजुरी संदर्भात प्राप्त होणा-या अर्जांवर निर्णय घेण्यासाठी धोरणात्मक सारखेपणा असावा या दृष्टीकोनातुन तपासणी सुचीची कार्यपद्धती अवलंबिण्यात आलेली आहे , ती खालील प्रमाणे..

**अ) अर्जदार यांचे कडुन आवश्यक असलेली कागदपत्रे**

1. शस्त्र परवाना मंजुरीच्या विहीत नमुना अ च्या अर्जावर रु.5 चा कोर्ट फी स्टँप असावा.
2. अर्जासमवेत आवश्यक असलेली कागदपत्रे,

अ) जिल्हयातील शिधा वाटप पत्रिकेची साक्षांकित प्रत,

आ) निवडणुक ओळखपत्र

इ ) मागील 3 वित्तीय वर्षांचे आयकर विवरणपत्र/सक्षम अधिका-याचा उत्पन्नाचा दाखला/ शासकिय येणे थकबाकी नसल्याचा दाखला (महसुल/जि.प./प.स./न.पा. )

ई) अर्जदार रहात असलेल्या परीसरातील दोन प्रतिष्ठीत नागरीकांकडुन त्यांचे चारीत्र्य प्रमाणपत्र

प) शैक्षणिक अर्हतेचा पुराव्याची साक्षांकित प्रत.

फ) वयाचा दाखल्यासंबधीचा पुराव्याची साक्षांकित प्रत.

ग) अर्जदार यांचा अधिवास दाखला

3. अर्जदार यांचे शस्त्राचा वापर व सुरक्षितता याबाबतचे प्रतिज्ञापत्र
4. अर्जदार हे शस्त्र हाताळण्यास शारीरीक व मानिसक दृष्टया सक्षम असल्याबाबत जिल्हाशल्यचिकित्सक यांचा दाखला.

**ब) पोलीस विभागाकडुन आवश्यक कागदपत्रे/अभिप्राय**

1 अर्जदार यांना शस्त्र परवाना मंजुर केल्यास सार्वजनिक शांतता व सुरक्षिततेस बाधा पोहचत असेल तेव्हा अशा परिस्थितीत शस्त्र परवाना मंजुर करता येणार नाही.

2. अर्जदार यांचेवर गुन्हे दाखल आहेत काय ?
असल्यास गुन्हयाची सद्यस्थिती व त्यानुसार पोलीस अधीक्षक यांचे विशेष अभिप्राय.

3. अर्जदार रहात असलेल्या परीसरातील काही व्यक्तींचे गुप्त जबाब व त्यांच्या कुटुंबीयांचे म्हणणे.

4. नंदुरबार जिल्हयाबाहेरील रहिवासी असलेल्या व्यक्तींचे शस्त्र परवाना संबंधीचे अर्ज त्यांनी त्यांच्या संबंधीत जिल्हयाचा परवाना प्राधिकरणाकडेच करावेत.अपवादात्मक परिस्थितीत नोकरीनिमित्ताने या जिल्हयात तात्पुरत्या स्वरुपात ज्यांचे वास्तव्य आहे व त्यांना स्वसरक्षणार्थ शस्त्र परवान्याची अत्यंत आवश्यकता असल्यास त्याबाबतीत विशेष बाब म्हणुन अभिप्राय. तसेच, अर्जदार रहात असलेल्या मुळ जिल्हयाच्या पोलीस अधीक्षक यांचा नाहरकत दाखला.

5. अर्जदार यांना स्वसंरक्षणार्थ शस्त्राची/शस्त्र परवान्याच्या आवश्यकतेबाबत अर्जदार यांचे जिवितास धोक्याबाबत घडलेल्या/ संभाव्य घटनेसंबंधी तपशील.

6. विहीत नमुन्यातील पोलीस रिपोर्ट

## POLICE REPORT

**Report on the Application for Licence to them for enquiry in the following form**

1. Charectar and Antecedents of the applicant :-
2. Financial and social positions of the applicant :-
3. Revenue or Incometax paied by the applicant :-
4. Service rendered to the Administration/Police Department :-
5. Size of the Town with the number of Arms already in the town (give particulars) :-
6. Any special ground for recommendations :-
7. Does the applicant already possess any Fire Arms and if so, state the reason for granting another licence :-
8. If the applicant is capable of using a Fire arms Effectively :-
9. The opinion of the ilaqa officer in support of the recommendation or grounds for rejection of the application :-
10. Remarks by the Taluka Executive Magistrate :-
11. Remarks by the Police Inspector :-
12. Remarks by the Supreintendent of Police (According to Checklist) :-

उक्त मुद्दा क्रमांक अ व ब च्या अनुषंगाने शस्त्र परवाना मंजुरी संदर्भात जिल्हास्तरावर वरील प्रमाणे कार्यपद्धतीचे काटेकोर अनुपालन अर्जदार व संबंधीत विभाग/चौकशी अधिकारी यांचे कडुन होणे अत्यावश्यक व बंधनकारक राहील.

स्वाक्षरीत xxx

**जिल्हादंडाधिकारी, नंदुरबार.**

प्रति,

१) पोलीस अधीक्षक नंदुरबार

२) उपविभागीय अधिकारी नंदुरबार/तळोदा

३) तहसिलदार नंदुरबार/नवापुर/तळोदा/शहादा/अक्कलकुवा अक्राणी यांना माहिती व पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी

प्रत-

४) माहिती अधिकारी नंदुरबार यांचे कडेस महितीसाठी व पुढील प्रसिद्धीसाठी

५) जिल्हा सुचना विज्ञान अधिकारी नंदुरबार यांना nandurbar.nic.in या संकेतस्थळावर प्रसिद्धीसाठी

६) म.विभागीय आयुक्त नाशिक विभाग नाशिक यांना माहितीसाठी सविनय सादर

जिल्हादंडाधिकारी नंदुरबार करिता

स्थळ प्रतीवर म.जिल्हादंडाधिकारी सो. यांची स्वाक्षरी असे